महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ 24 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 240 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# कर्नाटकला जाणाऱ्या एसटी बस बंद !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


मुंबई : महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या बेळगावमध्ये या ना त्या कारणावरून नेहमी कानडी गुंड उच्छाद मांडत असतात. अशातच कर्नाटक राज्यातील चित्रदुर्ग इथं महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चालकांना कर्तव्यावर असताना काही समाजकंटकांनी धक्काबुक्की करून काळं फासलं होतं. त्यामुळे आता राज्य सरकारने कडक पाऊल उचललं आहे. प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षितेसाठी कर्नाटक राज्यातील बस फेऱ्या रद्द केल्या आहे.

२२ फेब्रुवारी रोजी रात्री कर्नाटक राज्यातील चित्रदुर्ग येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चालकांना कानडी समाजकंटकांनी धक्काबुक्की करून काळं फासलं. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून त्याचा महाराष्ट्र परिवहन विभागाने निषेध केला आहे. या प्रकरणाची गंभीर देखल घेत प्रवासी आणि आमच्या कर्मचाऱ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन पुढील अनिश्चित काळासाठी कोल्हापूर विभागातून कर्नाटक राज्यात जाणाऱ्या महाराष्ट्राच्या एसटी बसेस रद्द करण्यात आल्या आहेत, याबद्दल निर्देश राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एस. टी. महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी) विवेक भीमनवार यांना दिल आहेत. दरम्यान, परिवहन मंत्री सरनाईक यांनी या घटनेत जखमी झालेले चालक भास्कर जाधव यांच्याशी दूरध्वनीवर बोलून त्यांना धीर दिला. तसंच " या प्रकरणात तुम्ही एकटे नसून, महायुती सरकार तुमच्या खंबीरपणे पाठीशी आहे." अशी ग्वाही देखील दिली. तसंच कर्नाटक शासन या संदर्भात स्पष्ट भूमिका घेऊन जोपर्यंत आपल्या शासनाची चर्चा करत नाही तोपर्यंत त्या भागातील महाराष्ट्राच्या एसटी बसेस रद्द करण्यात येतील' असे निर्देश देखील त्यांनी एसटी महामंडळाला यावेळी दिले आहे.

दरम्यान, सीमावर्ती भागातील तणाव लक्षात घेता, प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करणारे प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोल्हापुरातून कर्नाटक राज्यात जाणाऱ्या एसटी बसेस रद्द करण्यात आल्या आहेत. असे एसटी महामंडळ कडून कळवण्यात आले आहे.

**२१ फेब्रुवारी २०२५ रोजी ठिक २१.१० वाजता मुंबई आगाराची बस बंगळुरू-मुंबई येत असताना (बस क्रमांकMH14 K Q 7714) ही बस चित्रदुर्गच्या पाठीमागे दोन किलोमीटर आली होती. त्यावेळी तथाकथित कर्नाटक संघटनेचे कार्यकर्ते यांनी गाडी थांबवून बस आणि चालकाला काळं फासलं. तसंच कर्तव्यावर असणाऱ्या चालक भास्कर जाधव यांना मारहाण देखील करण्यात आली. हे दोघेही चालक आणि वाहक कोल्हापूर आगारात कार्यरत आहेत. त्यानंतर वरिष्ठांच्या सुचनेनुसार त्यांनी संबंधित पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार नोंदवली आहे. आज सकाळी विभाग नियंत्रक कोल्हापूर यांनी बस आणि चालक - वाहक यांना सुखरूप कोल्हापूर इथं आले.**






थोडक्यात महत्वाचे

## उल्हासनगरात स्वच्छतागृहाच्या कामात भ्रष्टचार !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : उल्हासनगर येथील पॅनल क्र. ३८ वार्ड नंबर ७ मधील हनुमाननगर, पाण्याच्या टाकीजवळ २० वर्षापूर्वी स्वच्छतागृह बांधले आहेत. दुरवस्था झालेल्या स्वच्छतागृहाच्या डागडुजीचे काम करून पालिका बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह ठेकेदाराच्या संगनमताने १५ लाख रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप जागरूक नागरिक श्रीनिवासराव बंडिकोला यांनी पालिका आयुक्तांसह जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीत केला आहे. अत्यल्प रंगरंगोटी, ग्रील, स्लायडिंग खिडक्या आदी अर्धवट कामे करून पूर्ण काम केल्याचे भासवून बिलाची रक्कम काढून भ्रष्टाचार केल्याचा आरोप बंडिकोला यांनी माहितीच्या अधिकारात मिळवलेल्या माहितीस अनुसरून दिलेल्या निवेदनात केला आहे.

## भारताचा पाकिस्तानवर विराट विजय



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

विराट कोहलीच्या शतकाच्या जोरावर भारताने पाकिस्तानविरूद्ध ६ विकेट्सने मोठा विजय मिळवला आहे. या विजयासह भारताने पाकिस्तानकडून २०१७ च्या फायनलमधील विजयाचा बदला घेतला आहे. कारण भारताने पाकिस्तानला पराभूत केल्याने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील त्यांचे आव्हान संपुष्टात आणले आहे. विराट कोहलीने जबरदस्त पुनरागमन करत पाकिस्तानविरूद्ध शतक झळकावले आणि भारताचा विजय निश्चित केला. विराट कोहलीने विजयी चौकार लगावला आणि भारताला विजय मिळवून दिला आणि स्वत: चे शतकही पूर्ण केले आहे. विराट कोहलीने १११ चेंडूत ७ चौकारांसह नाबाद १०० धावा करत आपले ५१ वे वनडे शतक पूर्ण केले आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने पुन्हा एकदा २४२ धावांचे लक्ष्य कोणत्याही अडचणीशिवाय जबरदस्त पद्धतीने पूर्ण केले. टीम इंडियाच्या या विजयाचा स्टार विराट कोहली होता, ज्याने उत्कृष्ट शतक झळकावून आपल्या पुनरागमनाचा डंकाही वाजवला आहे.

भारतीय संघाने आपल्या विजयासाठी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमीफायनलमध्ये आपली जागा जवळपास पक्की केली आहे. याशिवाय भारतीय संघ अ गटाच्या गुणतालिकेत पहिल्या स्थानी पोहोचला आहे. प्रथम भारतीय गोलंदाजांनी शानदार खेळ करत पाकिस्तानला कमी धावसंख्येपर्यंत रोखले, त्यानंतर भारतीय फलंदाजांनी शानदार खेळ करत सामन्यावर कब्जा केला.

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या अनुदानात ५० हजारांची वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांना आयुष्यभर वीज मोफत मिळणार आहे. या योजनेच्या अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ करण्याबरोबरचमोफत वीजेसाठी सौर पॅनलकरीता अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे या घरांना आयुष्यभर मोफत वीज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्यावतीने श्री छत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी येथे प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोन अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्राचे वाटप आणि १० लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्त्याचे वितरण कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.

फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत यापूर्वी १ लाख २० हजार रुपये, नरेगामधून २८ हजार आणि शौचालय बांधकामासाठी १२ हजार रुपये असे एकूण १ लाख ६० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते. आता यामध्ये ५० हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे; त्यामुळे आता यापुढे लाभार्थ्यांना दोन लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे. या योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांमध्ये आता मोफत वीज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, त्यासाठी सोलर पॅनलकरीता आवश्यक असणारी रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात येणार आहे. मोफत सोलर बसविण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांना आयुष्यभर मोफत वीज मिळेल.

### लाभार्थ्यांना आयुष्यभर वीज मोफत मिळणार

सामान्य माणसाला घरे देण्यासाठी एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राज्य सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली करत आहे. कारण मोदीजींच्या ठायी केवळ समाजातील गरीब, शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार पहिल्या रांगेत बसतो. त्यांनी सांगितले त्यांची पहिल्यांदा चिंता करा, त्याला घर द्या, असे त्यांचे सांगणे असते.ही घरे पुरुषांसोबतच महिलांच्या नावावर करण्यात येणार आहेत. जिल्हा प्रशासनाने लाभार्थ्यांना प्राधान्याने वाळू उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी, असे आदेश त्यांनी दिले. फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात एकूण १३ लाख ५७ घरांचे उद्दिष्ट देण्यात आले होते, त्यापैकी १२ लाख ६५ हजार घरांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित कामेही लवकरच पूर्ण करण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात एकाच वर्षामध्ये विक्रमी २० लाख घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. या सोबतच रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना, मोदी आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना अशा योजनेच्या माध्यमातून १७ लाख घरे बांधण्यात येत आहे. त्यामुळे केंद्र सरकार व राज्य शासन मिळून राज्यात ५१ लाख घरे बांधत आहे. याकरीता ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. तसेच यामध्ये सोलर पॅनलचा समावेश केल्यास सुमारे १ लाख कोटी रुपयांचा वापर करण्यात येणार आहे.

## मर्सिडीज वरून राजकारण सुसाट!

### गोऱ्हेंच्या मर्सिडीज बॉम्बने राजकीय गोटात खळबळ



### काय म्हणाले उद्धव ठाकरे ?

**निलम गोऱ्हे यांनी हे थेट आरोप उद्धव ठाकरे यांच्यावर केले आहेत. निलम गोऱ्हे या शिवसेनेत असताना ठाकरेंच्या अगदी जवळ होत्या. त्यांचा मातोश्रीवर वावरही सतत होता. अशा वेळी त्यांनी केलेल्या आरोपांना विशेष महत्व आहे.अशी वेळी उद्धव ठाकरे यावर काय प्रत्युत्तर देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. यावर उद्धव ठाकरे जरी जास्त बोलले नसले तरी त्यांनी मोजक्या शब्दात या आरोपांना उत्तर दिले आहे. हे सगळे गयेगुजरे लोकं आहेत. त्यांनी स्वतःचं चांगभलं करून घेतलं आहे. त्या महिला आहेत. त्यावर मी काही बोलणार नाही. असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी अधिक काही बोलणं टाळलं.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई: विधानसभेच्या उपसभापती आणि शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या निलम गोऱ्हे यांच्या वक्तव्याने सध्या राज्याचं राजकारण चांगलच तापलं आहे. 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात 'असे घडलो आम्ही' या कार्यक्रमात नीलम गोऱ्हे यांनी मोठा गौप्यस्फोट केला. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळतं असा गंभीर आरोप केला होता. तर गल्ला गोळा करण्याचं काम एकनाथ शिंदेंना दिल्याचं सांगत एकच खळबळ उडवून दिल होती. त्यानंतर राज्यात मर्सिडीज वरून राजकारण सुसाट सुटलं आहे. गोऱ्हे यांना शिवसेना ठाकरे गटांनी त्यांची चांगलीच कोंडी केली आहे.

### संजय राऊतांनी सुनावले



उद्धव ठाकरे यांनी याबाबत अधिक बोलण्याचं टाळलं असलं तरी खासदार संजय राऊत यांनी मात्र निलम गोऱ्हे यांना चांगलचं सुनावलं आहे. निलम गोऱ्हे यांना एकदा नाही तर तब्बल चार वेळा विधान परिषदेवर संधी देण्यात आली. ही संधी त्यांना उद्धव ठाकरे यांनी दिली होती. त्यांना विधान परिषदेचे उपसभापती पद ही देण्यात आलं होतं. त्यावेळी त्यांनी किती मर्सिडिज दिल्या? असा थेट सवाल राऊत यांनी गोऱ्हे यांना केला. तसा विचार करता त्यांनी 8 मर्सिटिड द्यायला पाहीजे होत्या. मग त्यांनी 8 मर्सिडिज दिल्या का? त्याच्या पावत्या त्यांनी आणून दाखवाव्यात असं खुल आव्हान ही राऊत यांनी गोऱ्हे यांना दिल्या.

### ठाकरे, राऊतांनंतर अंधारेंचाही प्रहार

सुषमा अंधारे यांनी ही मग निलम गोऱ्हे यांना घेरण्याची संधी सोडली नाही. मला मोठी गंमत वाटली. मला पक्षात येऊन दोन अडीच वर्ष झालीत. नीलम गोऱ्हे त्याआधी पंचवीस तीस वर्षे होत्या. अनेक कर्तृत्ववान लोकांच्या संधी हिसकावून घेत, चार वेळा आमदारकी भोगली. 18 महिने 13 त्रिकाळ त्या मातोश्रीवरच पडीक असायच्या. मातोश्रीच्या गेटमधून कुणाला प्रवेश द्यायचा कुणाला नाही द्यायचा, आज कुणाला भेटायला वेळ मिळेल, नाही मिळेल , कुणाची नियुक्ती करायची, सभा संमेलनांना कुठे वेळ द्यायची हे ठरवणाऱ्या नीलम गोऱ्हे होत्या असं अंधारे म्हणाल्या.

### ऐवढ्या पैशांचे काय केलं?

अंधारे पुढे म्हणतात, आता त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जर त्या पक्षात असताना आर्थिक व्यवहार चालायचे तर स्वाभाविक आहे की नियुक्त्या, नेमणुका, निवडणुकीची तिकीट या सगळ्या प्रक्रियेत नीलम गोऱ्हे होत्या. म्हणजे हा सगळा पैसा निलम गोऱ्हेंकडे येत असणार? काय केलं असेल त्यांनी एवढ्या पैशाचं? परदेशात एखादा बँक खातं असेलच की? असा प्रश्न त्यांनी केला. आज त्या बोलल्यानंतर, अनेक लोक अगदी शिंदे किंवा भाजपाकडे गेलेले सुद्धा आवर्जून फोन करून सांगत होते, की गोऱ्हे वाहिनी कशा पद्धतीने निष्ठावान शिवसैनिकांना मातोश्रीपासून दूर ठेवण्याचे कटाक्षाने प्रयत्न केले, असा थेट आरोप अंधारे यांनी केला आहे. त्यामुळे आता या सर्वांना गोऱ्हे काय उत्तर देतात ते पहावे लागले.

## शहापूर तालुक्यात तीव्र पाणी टंचाई

### फेब्रुवारीतच टँकरने पाणी पुरवठा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहापूर तालुक्यात सुमारे मार्च महिन्याच्या मध्यानंतर टँकरने पाणी पुरवठा करण्यात येतो. मात्र गेल्या दोन वर्षांपासून पाणी टंचाईची समस्या अधिक तीव्र झाल्याने फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच टँकरने पाणी पुरवठा सुरू करण्यात येत आहे. सुमारे १० गावांमध्ये भीषण पाणी टंचाई जाणवत असून या गावांमध्ये जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून टँकरने पाणी पुरवठा सुरू करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून देण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड या दोन्ही तालुक्यांमध्ये फेब्रुवारी महिन्याच्या अखेरच्या आठवड्यापासून पाणी टंचाई जाणवण्यास सुरुवात होते. तर शहापूर तालुक्यातील नागरिकांना याची भीषणता अधिक तीव्रतेने जाणवते. यासाठी जिल्हा परिषद तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून पाणी टंचाई जाणवणाऱ्या गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्यात येतो. यंदाही फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातच शहापूर मधील सुमारे १० गावांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तर येत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर जून महिन्यापर्यंत जिल्ह्यातील पाणी टंचाई जाणवणाऱ्या गावांना टँकरने, विंधन विहिरींच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्यासाठी आरखडा आखण्यात आला आहे. यातील सुमारे २२३ गावांसाठी पाणीपुरवठा करण्यासाठी १२ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे. मागील दोन वर्षाच्या कालावधीत शहापूर तसेच मुरबाड तालुक्यात कोट्यवधी रुपयांच्या निधीतून जलजीवन मिशन राबविण्यात आले. तसेच प्रत्येक घरात नळजोडणीही देण्यात आली. मात्र, अद्याप नळांद्वारे पाणीपुरवठा होऊ शकलेला नाही. त्यामुळे या जोडण्याचे काय करायचे, असा संतप्त सवाल शहापूरवासीय करीत आहेत.

## किल्ल्यांच्या पर्यटन विकास आराखड्यास केंद्राची मंजुरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अहिल्यानगरः सुमारे ५२६ वर्षांचा इतिहास सांगणाऱ्या, अहिल्यानगर शहराजवळील भुईकोट किल्ल्याचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी केंद्र सरकारच्या पर्यटन विभागाने २५ कोटी रुपयांच्या आराखड्यास मंजुरी दिली आहे. लवकरच हा निधी उपलब्ध होईल. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून या आराखड्यातील कामे होणार आहेत. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी ही माहिती 'लोकसत्ता'ला दिली. जिल्हा प्रशासनाने भूईकोट किल्ला पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी सुमारे ९५ कोटी रुपयांचा पर्यटन विकास आराखडा राज्य सरकारकडे सादर केला आहे. त्यातील २५ कोटी रुपयांच्या खर्चाच्या अराखड्यातील कामे केंद्र सरकारच्या माध्यमातून मार्गी लागणार आहेत.

१५ व्या शतकाच्या अखेरीस, इसवी सन १४९० मध्ये अहमदशहाने शहराच्या स्थापनेबरोबरच जवळच किल्ल्याची उभारणी केली. त्यानंतर हा किल्ला सुलताना चांदबिबी, मुघल, पेशवे, ब्रिटिश अशा सत्तांतरात हस्तांतरीत झाला. स्वातंत्र्य चळवळीत, १९४२ च्या चलेजाव आंदोलनात पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, डॉ. पी. सी. घोष या राष्ट्रीय नेत्यांना शहराजवळील भुईकोट किल्ल्यात बंदीवासात ठेवण्यात आले होते. पंडित नेहरू यांनी 'डिस्कवरी ऑफ इंडिया' ग्रंथ याच किल्ल्यात लिहिला. त्याची काही हस्तलिखिते आजही किल्ल्यात पाहायला मिळतात. याच किल्ल्यात डॉ प्रफुल्लचंद्र घोष यांनी 'हिस्टरी ऑफ एन्शंट इंडियन सिव्हिलायझेशन' हा ग्रंथ शब्दबद्ध केला. स्वातंत्र्यानंतर किल्ला लष्कराच्या ताब्यात देण्यात आला आताही तो लष्कराच्या ताब्यात आहे. मात्र स्वातंत्र्य चळवळीतील राष्ट्रीय नेत्यांच्या बंदीवासाची ठिकाणे नागरिकांसाठी पाहण्यास खुली आहेत. सुमारे १.५ किमीचा परीघ, खंदक, झुलता पूल, प्रवेशद्वार, वैशिष्ट्यपूर्ण रचना पाहण्यासारखी आहे. लगतच जॉगिंग ट्रॅक अलीकडच्या काळात तयार करण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या पर्यटन विभागाने 'चॅलेंज बेसड् डेस्टिनेशन डेव्हलपमेंट स्कीम' उपक्रमाच्या माध्यमातून पर्यटन विकास योजना तयार केली होती. त्यामध्ये स्वदेश दर्शन, धार्मिक स्थळे, सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळे, व्हायब्रंट व्हिलेज, इको पॉइंट आदी निकषानुसार आराखडे सादर करण्यास सांगण्यात आले होते.


### महाराष्ट्रात एकमेव मान्यता

जिल्हाधिकारी सालीमठ यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासनाने सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळ विकसित करण्याच्या प्रवर्गात सादर केलेला महाराष्ट्रातील एकमेव आराखडा मंजूर करण्यात आला. सुमारे २५ कोटी रुपये खर्चाचा हा आराखडा आहे. सुरुवातीला ३० टक्के, नंतर ३० टक्के, नंतर २० टक्के व अखेर १० टक्के अशा प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे.

### अराखड्यानुसार होणारी कामे

या आराखड्यात वाहनतळ, प्रवेशद्वार दुरुस्ती, स्वच्छतागृह, पथदिवे, राष्ट्रीय नेते बंदीवासात असलेल्या खोल्यांची डागडुजी, अँपी थिएटर, सौरऊर्जा प्रकल्प, वृक्ष लागवड, रोषणाई, किल्ल्याची माहिती देणारे संकेतस्थळ, मदतकक्ष, किल्ल्याची माहिती देणाऱ्या गाईडचे प्रशिक्षण व डिजिटल मार्केटिंग आदीं कामांचा समावेश आहे.

## वाचक मनोगत



### ‘छावा’ रणनीती आणि बलिदानावर प्रकाश टाकणारा मस्ट वॉच’ सिनेमा

अभिनेता विकी कौशल आणि अभिनेत्री रश्मिका मंदाना स्टारर ‘छावा’ सिनेमा सध्या सर्वत्र चर्चेत आहे. सिनेमात छत्रपती संभाजी महाराज यांची दमदार भूमिका साकारत विकी याने स्वतःचं नाव बॉलिवूडच्या अव्वल अभिनेत्यांच्या यादीत नोंदवलं आहे. ‘छावा’ सिनेमामुळे विकी कौशल याच्या करीयरला एक वेगळी दिशा मिळाली आहे. सिनेमा पहिल्या दिवसापासून बॉक्स ऑफिसवर देखील दमदार भूमिका साकारताना दिसत आहे. प्रेक्षकांना सर्व थिएटर हाऊस फूल केली आहेत. सांगायचं झालं तर, सिनेमात अशी कारणं आहेत, ज्यामुळे सिनेमा ‘मस्ट वॉच’ ठरत आहे. ‘छावा’ हा एक ऐतिहासिक सिनेमा आहे किंवा त्याऐवजी तो एक उत्कृष्ट मास्टरपीस आहे. या सिनेमाने रिलीजच्या पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आणि 31 कोटींच्या कलेक्शनसह ओपनिंग केलं. सिनेमात अनेक कारणं आहेत ज्यामुळे तो सिनेमागृहात पाहणे आवश्यक आहे. विकी कौशलचं दमदार अभिनय : ‘मसान’ (2015), ‘उरी: द सर्जिकल स्ट्राइक’ (2019), ‘सरदार उधम सिंह’ (2021) यांसारख्या सिनेमांमध्ये मुख्य भूमिका साकारत विकी कौशल चर्चेत आला. पण ‘छावा’ सिनेमामुळे अभिनेत्याच्या करीयरचा ग्राफ चढत्या क्रमावर पोहोचला आहे. महाराजांची भूमिका साकारण्यासाठी विकीने प्रचंड मेहनत घेतल्याचं सिनेमात दिसत आहे. ‘छावा’ सिनेमा पाहिल्यानंतर शरीरात वेगळीच ऊर्जा संचारते. सिनेमात विकीने अवॉर्ड विनिंग काम केलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आपल्या सर्वांना माहिती आहे, परंतु त्यांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल लोकांना फारशी माहिती नाही. ‘छावा’ सिनेमा छत्रपती संभाजी महाराजांचे लष्करी प्रतिभा, राजकीय रणनीती आणि वैयक्तिक बलिदान यावर खोलवर प्रकाश टाकते. ‘फाड़ देंगे मुगल सल्तनत की छाती अगर मराठा साम्राज्य के विरुद्ध सोचने की जुर्रत की’ आणि ‘मौत के घुंघरू पहनके नाचते हैं हम’ यांसारखे दमदार डायलॉग सिनेमात आहेत. स्टार कास्ट : सिनेमासाठी एकापेक्षा एक कलाकारांची निवड करण्यात आली आहे, ज्यामध्ये औरंगजेबच्या भूमिकेत अक्षय खन्ना आणि महाराणी येसूबाई यांच्या भूमिकेत रश्मिका मंदाना यांनीही त्यांच्या पात्रांमध्ये प्राण फुंकले आहेत.

**निलम प्रकाश महाजन,**
**लातूर**

# महिलांसाठी लोणच्याचा घरगुती व्यवसाय

लोणच्या व्यवसायाचे बरेच फायदे आहेत आणि उद्योजकांना ते एक्स्प्लोर करण्याची उत्तम संधी आहे. तथापि, उद्योजकांसमोर असलेला सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे लोणचा व्यवसाय कसा सुरू करावा, व्यवसाय सुरू करण्यासाठी कोणत्या आवश्यक आवश्यकता आहेत आणि व्यवसाय सुरू करण्यासाठी कोणत्या परवानग्या अनिवार्य आहेत. लोणच्या व्यवसायासाठी आधी जास्त तयारीची आवश्यकता नसते, तथापि, व्यवसाय सुरू करण्यासाठी काही आवश्यक गोष्टींमध्ये हे समाविष्ट आहे-

परवाने व कायदेशीर स्वरुपाचे

लोणच्या व्यवसायाची सुरूवात कशी करावी हे स्वतःला विचारण्यापूर्वी तुम्हाला पूर्वस्थिती आवश्यक आहे. व्यवसाय चालविण्यासाठी अनेकदा परवाने, परवानग्या आणि नोंदणी करणे अनिवार्य असतात. ते व्यवसायास कायदेशीर ओळख आणि रचना तसेच व्यवसाय संचालित करण्यासाठी नियम व कायदे ठेवण्यास मदत करतात.

स्वतःच अन्न हे अष्टपैलू आणि वैविध्यपूर्ण आहे आणि विविध प्रकारचे पॅलेट्स पुरवते. अस्तित्वाचा अविभाज्य भाग आणि सदाहरित व्यवसाय असल्याने, स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याच्या विचारात असताना अन्न खाणे चांगले आहे. एक खाद्यपदार्थ जी भारत आणि तेथील लोकांसाठी स्वदेशी आहे आणि नेहमीच मागणी असते, लोणची. देशातील प्रत्येक घरात वेगवेगळ्या प्रकारचे लोणचे असते जे जेवणाच्या वेळी आवश्यक असते. खरं तर, लोणची ही सर्वात जास्त मागणी असू शकते जी परदेशात प्रवास करणारे लोक त्यांच्याबरोबर घेतात आणि लोकांना देशातून बाहेर जाताना वासना म्हणून आठवते. म्हणून जर आपण लोणच्याचा व्यवसाय कसा सुरू करावा याबद्दल विचार करत असाल तर आपल्यासाठी हे स्थान आहे.



लोणच्या व्यवसायासाठी खासकरुन खाद्य व्यवसायात उद्योजकांचा प्रवास सुरू करणे ही एक उत्तम व्यवसाय कल्पना आहे. लोणचे वेगवेगळे फळे आणि भाज्या व्हिनेगर किंवा समुद्रात ठेवून वेगवेगळे मसाले आणि इतर घटकांसह तयार केले जातात. लोणचीची परिपूर्ण चव उत्तम प्रमाणात वेगवेगळ्या घटकांचे योग्य मिश्रण आणि प्रक्रियेसाठी योग्य वेळेवर अवलंबून असते. लोणचे कमी प्रमाणात लोकांना संपूर्ण जेवण तयार करण्यास मदत करू शकते, जे लोणच्याचा व्यवसाय सुरू करण्याच्या सकारात्मक बाबींपैकी एक आहे, त्याचे इतर फायदे –

**वाण** - लोणच्यामध्ये चकचकीत जाती आहेत, जसे की आंबा लोणचे, लिंबू लोणचे, मिरची आणि लसूण लोणचे, गाजर लोणचे, कोबीचे लोणचे, लोणचे, लोणचे, लोणचे, लोणचे, लोणचे, वेगवेगळ्या प्रकारच्या चव असलेले विविध प्रकार- काही आंबट, काही गोड, काही कडू, काही ॲसरबिक. हिमाचलमधील लिंगरी का आचर, राजस्थानमधील कैर (काळी मिरी) का आचर, आसाममधील भूत जोलोकिया आचार, महाराष्ट्रातील कोल्हापुरी थेचा आणि इतर बरेच काही यासारख्या स्थानिक स्वरूपाच्या पदार्थांनी बनविलेले भारतातील प्रत्येक क्षेत्राचे एक खास लोणचे आहे. हे विस्तृत वाण लोणचे व्यवसाय फायद्याचे आणि एक उत्तम व्यवसाय कल्पना बनवते.

**मागणी** - भारतीय जेवण लोणच्याशिवाय अपूर्ण असते आणि दररोज आवश्यक असते त्यामुळे लोणच्याला मोठी मागणी निर्माण होते. खरं तर लोणची इतकी लोकप्रिय आहे की परदेशात प्रवास करणाऱ्यांनी बऱ्याच गोष्टी न करता जरी त्यांच्याकडे अपयशी ठरल्याशिवाय लोणचीची बाटली सोबत नेली.

**तयारीची सोपी** - लोणचे किंवा आचार हे किण्वनयुक्त अन्नाचे एक प्रकार आहेत आणि ते तयार करणे अगदी सोपे आहे. लोणचे सहसा कमीतकमी घटकांसह तयार केले जाते आणि त्यात जास्त स्वयंपाक, किंवा स्वयंपाकाच्या गॅसचा विस्तृत वापर होत नाही.

**किमान उपकरणे** - लोणच्या बनवण्याच्या प्रक्रियेसाठी किमान उपकरणे आवश्यक असतात, फक्त ते मिश्रण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पात्रांवरच मर्यादित असतात, लोणचे आणि मसाले त्यात ठेवण्यासाठी ठेवतात. मोठ्या, औद्योगिक प्रमाणात लोणचे बनवताना वेगवेगळ्या मशीन्सची आवश्यकता असते जसे की बोगदा , लोणची मशीन किंवा लोणचे मिक्सिंग मशीन, लोणचे मॅरीनेट करण्यासाठी ठेवण्यासाठी मोठे कंटेनर आणि शेवटी डिलिव्हरी आणि किरकोळ विपणनासाठी लोणचे भरण्यासाठी भांड्यात ठेवा.

**किमान जागा** - लोणच्या बनवण्याच्या धंद्यास मोठ्या जागेची किंवा क्षेत्राची आवश्यकता नसते आणि गुणवत्तेवर परिणाम न करता लहान भागातही तयार करता येते. खरं तर, लोणचे बनवण्याचे बरेच व्यवसाय उद्योजकांच्या स्वयंपाकघरातून सुरू होतात. इच्छुक उद्योजक ज्यांना छोट्या प्रमाणावर सुरुवात करायची आहे आणि नंतर त्यांचा व्यवसाय वाढवायचा आहे, ते आपल्या घरातून किंवा छोट्या जागेतून किंवा सुटे खोलीतून ऑपरेट करू शकतात.

**किमान गुंतवणूक** - लोणची बनवणाऱ्या व्यवसायासाठी जास्त गुंतवणूकीची आवश्यकता नसते कारण व्यवसायाच्या मागण्या कमीतकमी असतात. व्यवसायासाठी लागणाऱ्या बहुतेक खर्चामध्ये घटकांची खरेदी करणे आणि व्यवसायाचे मार्केटिंग करणे समाविष्ट आहे. अन्य खर्चामध्ये व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक परवाने आणि नोंदणी घेणे समाविष्ट आहे.

**महिला उद्योजकांसाठी आदर्श** – अनेकदा इच्छुक महिला उद्योजकांचा उत्साह असतो परंतु त्यांच्या आवडी, त्यांची सामर्थ्य आणि व्यवहार्यता विचारात घेता येईल अशा व्यवसाय कल्पनांचा अभाव असतो. लोणचे व्यवसाय अशा महिला उद्योजकांसाठी आदर्श आहे ज्यांना स्वत: ला स्थापित करावे आणि स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय सुरू करायचा असेल. गुणवत्ता व सुरक्षितता मानदंड सुनिश्चित करण्याव्यतिरिक्त, अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेबद्दल ग्राहकांवर विश्वास आणि विश्वास जोडून मोठ्या संख्येने ग्राहकांना आकर्षित करण्यास मदत करते. तसेच, इतर किरकोळ स्टोअर्स, किराणा दुकान आणि सुपरमार्केटमध्ये लोणचे वितरित करण्याचा विचार करीत असताना, एफएसएसएआय परवान्यामुळे उत्पादनांसाठी चांगली प्रतिष्ठा निर्माण होते आणि अशा प्रकारे त्यांची विक्री करण्यास मदत होते.

### दुकान कायदा

शॉप ॲक्ट लायसन्स नगरपालिका हद्दीत कार्यरत असलेल्या दुकानांना लागू आहे. शॉप नोंदणी ॲक्ट नुसार लोणच्या दुकानात काम करणाऱ्या लोकांचे वेतन, कामाचे तास, रजे, सुट्या, सेवेच्या अटी आणि इतर कामाच्या अटींचे नियमन करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. शॉप ॲक्ट ही एक अनिवार्य नोंदणी आहे आणि व्यवसाय परिसरातील प्रमुख ठिकाणी शॉप ॲक्ट दस्तऐवज प्रदर्शित करणे अनिवार्य आहे. शहराच्या हद्दीत वसलेल्या लोणच्या व्यवसायासह किरकोळ दुकानांना दुकान कायदा नोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

# वाढदिवस व्हॉट्सअपचा

आजचे युग हे सोशल मिडियाचे युग आहे आणि या सोशल मीडियाच्या युगात प्रत्येकाच्या मोबाईल मध्ये अनेक मेसेजिंग ॲप्लिकेशन आहेत आपणही दररोज अनेक मेसेजिंग ॲप्लिकेशनचा वापर करतो. या मेसेजिंग ॲप्लिकेशनमध्ये सर्वाधिक लोकप्रिय आणि सर्वाधिक वापरले जाणारे मेसेजिंग ॲप्लिकेशन म्हणजे व्हाट्सअप. याच सर्वाधिक लोकप्रिय आणि वापरले जाणाऱ्या व्हॉट्सअप या मेसेजिंग ॲप्लिकेशनचा आज वाढदिवस आहे. व्हॉट्सअप हा आज परवलीचा शब्द झाला आहे. आज प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये दुसरे कोणते ॲप्लिकेशन असो वा नसो पण व्हॉट्सअप हमखास बघायला मिळते. २४ फेब्रुवारी २००९ रोजी जेन कॉम याने व्हाट्सअप inc नावाची कंपनी स्थापन केली. व्हाटसअपचा निर्माता जेन कॉम याचा जन्म युक्रेन देशातील छोट्या गावात झाला. त्याचे वडील मजूर तर आई गृहिणी होती. युक्रेनमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यावर त्याचे वडील अमेरिकेत स्थलांतरित झाले. तिथे ते छोटीमोठी कामे करू लागले. जेन कॉम याला कॉम्प्युटर प्रोग्रामिंगची आवड होती. त्याच्या घराजवळच एक लायब्ररी होती. तेथून तो कॉम्प्युटर प्रोग्रामिंगचे पुस्तके आणत व घरच्या कॉम्प्युटरवर प्रोग्रामिंग करीत. पुढे त्याने कॉम्प्युटर सायन्समध्ये डिग्री मिळवून एका सॉफ्टवेअर कंपनीत सिक्युरिटी टेस्टर म्हणून काम सुरू केले. १९९७ साली याहू कंपनीने इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअर या पदावर त्याची नेमणूक केली. या कंपनीत त्याने ९ वर्ष नोकरी केली. दुसऱ्या कंपनीत नोकरी करण्यापेक्षा स्वतःची कंपनी सुरू करावी या विचाराने त्याने याहूला राजीनामा दिला. याहूमध्ये ब्रायन अकटन हा त्याचा सहकारी होता. त्यानेही याहूला राजीनामा दिला. दोघांनी मिळून स्वतःची कंपनी स्थापन करण्याचे ठरवले. त्या सुमारास ॲप्पल कंपनीने आयफोन बाजारात आणला होता. त्यात मेसेज पाठवण्याची सुविधा होती. त्यावरून त्यांना व्हॉट्सअपची कल्पना सुचली. पुढे दोघांनी त्यावर काम करण्यास सुरवात केली. या प्रयोगात त्यांना यश मिळाले का नाही हे विचारण्यासाठी त्यांच्या मित्राने त्यांना विचारले व्हॉट्सअप ! व्हॉट्सअप या शब्दाचा अर्थ होतो काय झाले ? हा शब्द कानावर पडता क्षणीच त्यांनी ठरवले आपल्या कंपनीचे नाव आपण व्हॉट्सअप हेच ठेवायचे. २४ फेब्रुवारी २००९ रोजी त्यांनी व्हॉट्सअप inc नावाची कंपनी स्थापन केली. सुरवातीला व्हॉट्सअपला खूपच कमी प्रतिसाद मिळाला कारण तेंव्हा अँड्रॉइड मोबाईलची संख्या खूप कमी होती पण जशी अँड्रॉइड मोबाईलची संख्या वाढत गेली तशी व्हॉट्सअप वापरणाऱ्यांची संख्याही वाढत गेली. आज व्हॉट्सअप जगातील पहिल्या क्रमांकाचे एप्लिकेशन बनले आहे. जगातील किमान दोनशे कोटीहून अधिक लोक व्हॉट्सअपचा वापर करतात. प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये व्हॉट्सअप असतेच. व्हॉट्सअपवर रोज एक लाख कोटीहून अशिक मेसेज सेंड होतात. व्हॉट्सअप वरुन दररोज ५०० कोटीहून अधिक फोटो तसेच १०० कोटीहून अधिक व्हिडीओ शेअर होतात. सुरवातीला फक्त इंग्रजीमध्ये असणारे व्हॉट्सअप आज ५३ भाषांमध्ये आहे. व्हॉट्सअप नेहमीच नवनवीन सुविधा वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करुन देते. व्हिडिओ कॉल, ऑडियो कॉल, स्टेटस अशा नवनवीन सुविधा व्हॉट्सअप कडून वापरकर्त्यांना देण्यात आल्या आहेत. आज व्हॉट्सअप वरून पैसेही पाठवता येऊ शकतात. २०१४ साली फेसबूकच्या मार्क झुकेरबर्ग याने १९ बिलियन डॉलरला जेन कॉम आणि ब्रायन अकटन यांच्याकडून व्हॉट्सअप खरेदी केले. आज व्हॉट्सअपची मालकी मार्क झुकेरबर्ग यांच्याकडे आहे. आज व्हॉट्सअप प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. आपली दिवसाची सुरुवात व्हॉट्सअपनेच होते. सकाळी झोपेतून उठल्यावर आपण जर पहिल्यांदा काय पाहत असतो तर ते व्हॉट्सअप ! आपण झोपताना ही व्हॉट्सअप पाहूनच झोपतो.

व्हॉट्सअप वर ग्रुपची सुविधा सुरू झाल्याने एकाच वेळी शेकडो लोकांना मेसेज पाठवण्याची सुविधा निर्माण झाली. व्हॉट्सअप वर आज कोयावधी ग्रुप आहे. केवळ मित्रांचे नातेवाईकांचे च नाही तर शासकीय नोकरांचे देखील ग्रुप आहे. शासकीय संदेश, आदेश देखील आता व्हॉट्सअप वर दिले जातात. लहान मुलांपासून थोरांपर्यंत सर्वांच्या जीवनाच्या अविभाज्य भाव बनलेल्या व्हॉट्सअपला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**१९९७ साली याहू कंपनीने इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअर या पदावर त्याची नेमणूक केली. या कंपनीत त्याने ९ वर्ष नोकरी केली. दुसऱ्या कंपनीत नोकरी करण्यापेक्षा स्वतःची कंपनी सुरू करावी या विचाराने त्याने याहूला राजीनामा दिला. याहूमध्ये ब्रायन अकटन हा त्याचा सहकारी होता. त्यानेही याहूला राजीनामा दिला. दोघांनी मिळून स्वतःची कंपनी स्थापन करण्याचे ठरवले. त्या सुमारास ॲप्पल कंपनीने आयफोन बाजारात आणला होता. त्यात मेसेज पाठवण्याची सुविधा होती. त्यावरून त्यांना व्हॉट्सअपची कल्पना सुचली. ....**

**श्याम ठाणेदार**



# अवैध वाळूनं कुटुंब संपवलं !

## वाळूचा टिप्पर घरावर ओतल्याने पाच जणांचा मृत्यू

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

अवैध पद्धतीने वाहतूक केल्या जाणाऱ्या वाळूचा टिप्पर घरावर ओतल्याने त्या वाळूखाली दबून एकाच कुटुंबामधील पाच जणांचा मृत्यू झाला आहे. जालना जिल्ह्यातील जाफराबादमध्ये मध्यरात्री ही घडली आहे. पासोडी शिवारातील पुलाच्या बांधकामासाठी हे कुटुंब आलेलं होतं. बांधकामाच्या नजीकच एका पत्र्याच्या शेडमध्ये त्यांनी आपला संसार थाटलेला होता. पंचनामा झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेऊ नयेत, असा ठाम पवित्रा गावकऱ्यांनी घेतला होता. शनिवारी (22 फेब्रुवारी) पहाटे साडेतीन वाजता ही घटना घडली असून अवैध वाळू वाहतुकीचा विषय असल्याने महसूल पथकालाही पाचारण करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अवैधरित्या वाळूचा उपसा करून वाहतूक करणाऱ्या टिप्परने पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास थेट पत्र्याच्या शेडवर वाळू ओतल्याने वाळूच्या ढिगाऱ्याखाली दबून पाच जणांचा मृत्यू झाला आहे.

या घटनेनंतर गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या व्यक्तींना वाचवण्याचा प्रयत्न गावकऱ्यांनी केला. या प्रयत्नाअंती वाळूच्या ढिगाऱ्याखालून एका लहान मुलीला सुखरूप बाहेर काढण्यात यश आलं आहे. इतर पाच जणांचा मात्र जागेवरच मृत्यू झाला आहे. जाफराबाद तालुक्यातील पासोडी शिवारात एका पुलाच्या कामासाठी हे मजूर आले होते. पुलाच्या बांधकामाच्या ठिकाणा जवळच असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये हे कुटुंब झोपलेलं होतं. मध्यरात्री साडेतीन वाजता आलेल्या वाळूच्या टिप्परचालकाने निष्काळजीपणाने वाळूचा टिप्पर पत्र्याच्या शेडवर रिचवल्याने शेडमध्ये झोपलेले 6 जण ढिगाऱ्याखाली दबले गेले, अशी माहिती गावकऱ्यांनी दिली.

या शेडच्या समोरच्या खोलीत झोपलेल्या महिलेच्या लक्षात हा प्रकार आल्यानंतर तिने मदतीसाठी आरडाओरडा केला. त्यानंतर टिप्परचालकाने तिथून पळ काढला. या महिलेने आजूबाजूच्या गोठ्यावर जाऊन शेतकऱ्यांना बोलावून आणलं. त्यानंतर त्यांनी वाळू बाजूला करून पाच जणांना बाहेर काढलं. त्यापैकी एका 12 वर्षीय मुलीला वाचवण्यात गावकऱ्यांना यश आलं आहे. मात्र, इतर पाच जणांचा जागीच दबून मृत्यू झाला आहे. पहाटे साडेतीन वाजता ही घटना घडली असता जाफराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक इंगळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. या मृतांमध्ये गणेश काशिनाथ धनवई (वय 50) रा. गोळेगाव, ता. सिल्लोड, भूषण गणेश धनवई (वय 17) रा. गोळेगाव, ता. सिल्लोड, राजेंद्र दगडूबा वाघ (वय 40) रा. दहिद, ता. बुलढाणा, सुनील समाधान सपकाळ, (वय 20) रा. पद्मावती, ता. भोकरदन जि. जालना, सुपडू आहेर, (वय 38) रा. तोंडापूर, ता. जामनेर, जि. जळगाव यांचा समावेश आहे. मृतक सर्वजण एकमेकांचे सख्खे नातेवाईक आहेत. स्वस्त वाळू उपलब्ध व्हावी या उद्देशाने ठेकेदार रात्रीच्या वेळी अवैध वाळू उपसा करून टाकत होता. या ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे पाच जणांचा मृत्यू झाला असल्याचा दावा गावकरी करत आहेत.

# स्कीन केअरमध्ये ऑलिव्ह ऑईलचा समावेश



ऑलिव्ह ऑईल हे असं तेल आहे ज्याचा वापर स्वयंपाक, त्वचेची देखभाल, केसांची निगा राखण्यासाठी करता येतो. या तेलात असलेले व्हिटॅमिन ई, ओलेइक अॅसिड, लिनोलेइक अॅसिडस, स्क्वालेन आरोग्याप्रमाणेच केस आणि त्वचेसाठी उपयुक्त असतात. हिवाळ्यात तर तुम्हाला ऑलिव्ह आईलचा स्कीन केअरसाठी जास्त चांगला फायदा होतो. ऑलिव्ह ऑईलचे सौंदर्य फायदे जाणाल तर तुमच्या स्कीन केअरमध्ये या तेलाचा अवश्य समावेश कराल. यासाठी जाणून घ्या याचा वापर सौंदर्य खुलवण्यासाठी कसा करावा. यासोबतच जाणून घ्या आणखी काही ऑलिव्ह तेलाचे फायदे

अनेक मॉईस्चराईझिंग क्रीममध्ये ऑलिव्ह ऑईलचा वापर केला जातो. त्यामुळे वातावरणातील बदलांमुळे जेव्हा त्वचा कोरडी आणि निस्तेज होते अशा वेळी तुम्ही या तेलाचा अगदी मॉईस्चराईझर प्रमाणे वापर करू शकता. यासाठी रात्री झोपताना चेहऱ्यावर काही थेंब ऑलिव्ह आईल लावा आणि बोटांनी मसाज करून ते त्वचेत मुरवा. मात्र तेलकट त्वचा असेल तर मात्र याचा वापर करू नका. कारण यामुळे तुमच्या चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची समस्या वाढेल. केसांचे योग्य पोषण होण्यासाठी केसांना उत्तम कंडिशनरची गरज असते. तुम्ही केसांना योग्य पोषण मिळावं यासाठी ऑलिव्ह ऑईल वापरू शकता. यासाठी रात्री झोपताना ऑलिव्ह ऑईलचे काही थेंब स्काल्पवर लावा आणि मसाज करा. सकाळी तुम्ही केस धुवून टाकले तरी तुमचे केस चमकदार दिसतील. हाताच्या बोटांची आणि नखांची निगा राखण्यासाठी तुम्ही ऑलिव्ह आईलचा वापर करू शकता. यासाठी हात आणि नखांना नियमित ऑलिव्ह आईलने मसाज करा. खोलवर पोषण मिळाल्यामुळे तुमच्या नखांचे क्युटिकल्स मऊ आणि नखं मजबूत होतील. त्वचा स्वच्छ करण्यासाठी अथवा मेकअप काढण्यासाठी तुम्ही ऑलिव्ह आईलचा वापर करू शकता. कारण या तेलाने मेकअप काढल्यास मेकअप तर सहन निघेलच पण त्वचा कोरडी पडणार नाही.

# गुडघेदुखीसाठी आलं आणि हळद उत्तम

गुडघेदुखी ही एक सामान्य समस्या आहे. आता केवळ वृद्धच नाही तर तरुणांनाही याचा सामना करावा लागत आहे. आहारात Vitamin D, Calcium आणि Iron यासारख्या आवश्यक पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे आणि वाढत्या वयामुळे स्नायू आणि टिश्यूसचे नुकसान झाल्यामुळे ही समस्या उद्भवते. अनेकांना प्रश्न असतो की गुडघेदुखीवर उपचार काय? तर सगळयात महत्त्वाचे म्हणजे गुडघेदुखीला हलक्यात घेऊ नये. घरगुती उपाय, व्यायाम आणि औषधांनी गुडघेदुखीवर उपचार करता येतात. स्नायूंमधील ताण किंवा सांधेदुखी तसेच गुडघेदुखीसाठी आले उत्तम आहे.

आल्यामध्ये अँटीइंफ्लेमेट्री, अँटीअल्सर आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात. ते रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. यासाठी तुम्ही आल्याचा चहा किंवा आल्याचे पाणी पिऊ शकता किंवा आल्याची पेस्ट बनवून वेदना होणा-या जागी लावू शकता हळदीमध्ये अँटीइन्फ्लमेट्री गुणधर्म असतात आणि हळद हे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. गुडघेदुखीवर उपचार करण्यासाठी हळदीचा वापर अनेक प्रकारे करता येतो. गरम दुधात हळद मिसळून तुम्ही याचे सेवन करू शकता. शिवाय तुम्ही प्रभावित भागावर हळदीची पेस्ट देखील लावू शकता.



## सोमवार २४ फेब्रुवारी २०२५

**मेष**
लोकांच्या विचारांमुळे आणि तुमच्याबद्दल सांगितलेल्या गोष्टींमुळे अस्वस्थता वाटू शकते.

**वृषभ**
या राशीचे विद्यार्थी आज त्यांच्या अभ्यासात उत्साही असतील आणि अभ्यासात जास्त वेळ घालवतील.

**मिथुन**
प्रगती पाहून कुटुंबातील सदस्यांनाही हे पाहून आनंद होईल. आज थोड खर्च होऊ शकतो.

**कर्क**
आपली अर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत राहील. आज तुमचा दिवस आनंदाचे क्षण घेऊन आला

**सिंह**
व्यवसायात तुमची व्यस्तता वाढेल. तुमची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा सामान्य असेल.

**कन्या**
वैवाहिक जीवनात परस्पर समन्वय राहील. चुकांमधून शिकून तुम्हाला पुढे जाण्याची प्रेरणा मिळेल.

**तूळ**
स्वतःवर विश्वास ठेवा दिवस चांगला जाईल. व्यावसायिकांनी व्यवसायनियोजन करावे

**वृश्चिक**
आज प्रगतीचे नवीन मार्ग सापडतील. गुंतागुंतीच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील,

**धनु**
योजनेवर काम केल्यास तुमची सर्व नियोजित कामे पूर्ण होतील. गुंतवणूक करण्यापूर्वी संशोधन करा.

**मकर**
नुकसान होण्यापासून संरक्षण होईल करेल. दिवस आनंद देणारा आहे. पूर्वी केलेले काम आज पूर्ण होईल.

**कुम्भ**
दिवस तुम्हाला सकारात्मक परिणाम देईल. आज तुमचा संयम ठेवा आणि वेळेनुसार वाटचाल करा.

**मीन**
भावनांवर नियंत्रण ठेवा, फायदा होईल. मित्र नवीन भेटवस्तू घेऊन येतील. चुकांमधून शिकता येईल.

# वन परीसरात सीसीटीव्ही - गणेश नाईक

ठाणे : ठाण्यातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील मामा भाचे डोंगरावर काही दिवसांपूर्वी आग लागून अनेक वृक्ष जळून खाक झाली होती. परिसरातील गर्दुल्ले आणि अनधिकृतपणे राहणारे लोक नशा करत असल्याने ही आग जाणीवपूर्वक लावल्याचा संशय महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी व्यक्त केला होता. त्यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना पत्र देऊन या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती केली होती. नुकतीच पाचंगे यांनी वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेतली. त्यावेळी या गर्दुल्ल्यांचा बंदोबस्त करणार असून जंगलात सीसीटीव्ही बसविणार असल्याचे आश्वासन वन मंत्र्यांनी दिल्याचे पाचंगे



यांनी सांगितले. काही दिवसांपूर्वीच मामा भाचे डोंगर येथे भीषण आग लागली होती. या आगीत अनेक वृक्ष भस्मसात झाली. वृक्षांवरील पक्षी, किटक यांचाही यामुळे निवारा नष्ट झाला. आगीमुळे येथील निसर्गसंपदेचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले होते. त्यामुळे काही दिवसांपूर्वीच मनसेचे विद्यार्थी सेनेचे सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी वन मंत्री गणेश नाईक यांना याबाबत चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली होती.

येथील जंगलात काही गर्दुल्ले आणि अनधिकृतपणे राहणारे काही लोक नशेसाठी जातात. या गर्दुल्ल्यांवर कारवाई केली जावी अशी मागणी त्यांनी केली होती. यापूर्वी त्यांनी वन विभागाच्या सुमारे १२०० चौरस मीटर जागेवर झालेल्या अनधिकृत बांधकामांविरोधात तक्रार केली होती. त्यानंतर वनविभागाने गुन्हा दाखल केला. मात्र राजकीय दबावामुळे कारवाई पूर्णत्वास जाऊ शकली नाही. या भागातील अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट झालेला दिसून येत असल्याचा आरोपही पाचंगे यांनी केला होता.

पाचंगे यांनी नुकतीच वन मंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन त्यांना या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती केली. त्यावेळी गणेश नाईक यांनी येथील गर्दुल्ल्यांचा बंदोबस्त करणार असल्याचे आश्वासन दिले. तसेच जंगलात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे आगीचे प्रकार रोखता येऊ शकता असे आश्वासनही त्यांनी दिल्याचे संदीप पाचंगे यांनी सांगितले.

अनधिकृत वसाहत आणि वाढती लोकसंख्या सुरक्षा यंत्रणांसाठी चिंतेचा विषय

वायू दलाच्या तळा जवळच असलेल्या कान्हेरी हिल परिसरातील मामा-भांजे दर्ग्याच्या आसपास काही अनोळखी लोक स्थलांतरित झाले आहेत. यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मोठा धोका निर्माण झाला आहे. भारतीय वायुसेनेच्या अधिकाऱ्यांनीही या संदर्भात तक्रार नोंदवली होती. राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीत होणारी अनधिकृत वसाहत आणि वाढती लोकसंख्या सुरक्षा यंत्रणांसाठी चिंतेचा विषय बनली आहे, असेही पाचंगे यांनी म्हटले होते.

# सरकारकडून महिलांना गिफ्ट रेशनवर मिळणार साडी ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यातील अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांसाठी मोठी आनंदवार्ता आहे. सरकारने यंदाही अंत्योदय रेशनकार्डधारक महिलांना मोफत साडी वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, येत्या होळीच्या सणापूर्वी या साड्यांचे वाटप स्वस्त धान्य दुकानांमार्फत करण्यात येणार आहे. राज्यातील लाखो महिला लाभार्थींसाठी ही अत्यंत महत्त्वाची बातमी आहे, कारण यामुळे त्यांच्या उन्हाळ्यातच दिवाळी सारखा आनंद होणार आहे.

मागील वर्षीही राज्य शासनाकडून अंत्योदय योजनेतून स्वस्त धान्य घेणाऱ्या कुटुंबातील एका महिलेला साडी वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याची अंमलबजावणी मार्च महिन्यात करण्यात आली होती. यंदाही सरकारने याच धर्तीवर योजनेचे पुनरुज्जीवन केले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर लाभार्थ्यांना सरकारकडून अशी खुशखबर मिळेल याची उत्सुकता होती. आता ही प्रतीक्षा संपली असून, राज्यभरातील अंत्योदय लाभार्थ्यांना होळीपूर्वी हे विशेष गिफ्ट मिळणार आहे.

पुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य यंत्रमाग महामंडळाकडून साड्यांचा पुरवठा झाल्यानंतर, स्थानिक स्तरावर पुरवठा विभागामार्फत स्वस्त धान्य दुकानातून साड्यांचे वाटप करण्यात येणार आहे. प्रत्येक अंत्योदय रेशनकार्डधारक कुटुंबातील एका महिलेला वर्षातून एकदा ही साडी मोफत मिळणार आहे.

**जिल्हावार लाभार्थींची संख्या**

जालना जिल्ह्यात जवळपास 44,160 महिलांना अंत्योदय योजनेच्या माध्यमातून साडी मिळणार आहेत. तर पुणे जिल्ह्यातील एकूण 48,874 महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय वाटपाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे:

बारामती – 7,975 (सर्वाधिक)
दौंड – 7,222
जुन्नर – 6,838
पुरंदर – 5,285
आंबेगाव – 5,137
इंदापूर – 4,453
शिरूर – 3,990
खेड – 3,218
भोर – 1,909
मावळ – 1,536
मुळशी – 540
हवेली – 251

पुणे जिल्ह्यातील सर्वाधिक लाभार्थी हे बारामती तालुक्यात असून, तेथे 7,975 महिलांना साड्यांचे वाटप होणार आहे. तर हवेली तालुक्यात सर्वात कमी 251 लाभार्थी आहेत.

**साड्यांच्या दर्जाबाबत सावधानता**

गेल्या वर्षी मार्च महिन्यात वाटप केलेल्या साड्यांच्या दर्जावरून अनेक तक्रारी उद्भवल्या होत्या. बऱ्याच ठिकाणी साड्या फाटक्या आणि कुचकामी निघाल्यामुळे महिलांचा हिरमोड झाला होता. अनेक महिलांनी या निकृष्ट दर्जाच्या साड्यांबाबत नाराजी व्यक्त केली होती. यावर्षी अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी, पुरवठा विभागाने सर्व लाभार्थ्यांना रेशन दुकानातच साड्या तपासून घेण्याचे आवाहन केले आहे.

पुरवठा विभागाचे उपायुक्त श्री. राजेश पवार यांनी सांगितले, "साड्यांच्या गुणवत्तेवर यंदा विशेष लक्ष देण्यात आले आहे. तरीही, सर्व लाभार्थी महिलांनी साडी स्वीकारताना तिची तपासणी करावी. त्यामध्ये कोणताही दोष आढळल्यास त्वरित तक्रार नोंदवावी, जेणेकरून त्याचे निराकरण लवकरात लवकर होऊ शकेल."

मागील वर्षी राज्य सरकारने एका साडीसाठी राज्य यंत्रमाग महामंडळाला 355 रुपये दिले होते. यंदाही साधारण याच किंमतीत साड्यांची खरेदी करण्यात आली असल्याचे समजते. यंत्रमाग महामंडळाने साड्यांच्या गुणवत्तेची हमी दिली असून, यंदा दर्जेदार साड्यांचे वाटप होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**योजनेचे महत्त्व**

अंत्योदय अन्न योजना ही देशातील अत्यंत गरीब कुटुंबांना किफायतशीर दरात अन्नधान्य पुरवण्यासाठी राबवली जाणारी योजना आहे. या योजनेंतर्गत, पात्र कुटुंबांना प्रति माह प्रति कुटुंब 35 किलो अन्नधान्य अत्यंत स्वस्त दरात दिले जाते. राज्य सरकारने या योजनेच्या लाभार्थींना अतिरिक्त लाभ म्हणून मोफत साडी वाटपाचा निर्णय घेतला आहे. सामाजिक समतेसाठी कार्यरत संस्थेच्या अध्यक्षा सौ. उषा पाटील म्हणाल्या, "सरकारी योजनांचा लाभ ग्रामीण आणि दुर्गम भागातील महिलांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. या योजनेमुळे गरीब महिलांना थोडा का होईना दिलासा मिळतो. साडी ही भारतीय महिलांच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे, आणि प्रत्येक महिलेला सणावाराला नवीन साडी परिधान करण्याचा अधिकार आहे."

### पालघर जिल्ह्यातील शैक्षणिक समस्या सोडण्याकरिता

# आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी जिल्हा परिषदेत घेतली बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर** : दि. 1 फेब्रुवारी 2025 रोजी दुपारी तीन वाजता पालघर जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर बांधवांच्या प्रलंबित असलेल्या विविध शैक्षणिक समस्यांकरिता कोकण विभागाचे शिक्षक आमदार आदरणीय श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे सरांनी पालघर जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक सौ.संगीता भागवत मॅडम, शिक्षणाधिकारी प्राथमिक सौ. सोनाली मातेकर मॅडम, व वेतन पथक व भविष्य निर्वाह निधीचे अध्यक्ष श्री. नरेश पाटील साहेब यांच्यासमवेत बैठक घेऊन जिल्ह्यातील शिक्षकांच्या व शिक्षिकेचा बांधवांच्या विविध शैक्षणिक समस्या मांडल्या व त्या समस्या तत्काळ सोडवण्याच्या सूचना दिल्या, याप्रसंगी महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे राज्यसचिव अरुण भोईर सर, पालघर जिल्हा संपर्कप्रमुख विठ्ठल गोरे सर, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डेरेल डिमेलो सर, पालघर जिल्ह्याचे अध्यक्ष (शहर) महेश कुडू सर, पालघर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष जयंता पाटील सर, समीर पिंपळे सर, राजेंद्र सांबरे सर, राजेंद्र पाटील सर, जतीन कदम सर, जितेंद्र साठे सर, कैलास देवरे सर, निलेश भोईर सर, प्रीतम घरत सर, कुलकर्णी सर व शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे प्रमुख पदाधिकारी, अनेक शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर बांधव उपस्थित होते.

# कौपीनेश्वर मंदिर समितीकडून महाशिवरात्रीनिमित्त गर्दी व्यवस्थापन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या कौपीनेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्ताने अति महत्वाच्या व्यक्तींसह नागरिकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन कौपीनेश्वर मंदिर समितीने गर्दीचे विभाजन करण्यासाठी विशेष नियोजन आखले आहे. गर्दी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याची काळजी घेत मंदीरातील दर्शनासाठी ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला, अपंग, तसेच अतिमहत्वाच्या व्यक्ती असे चार प्रवेशद्वार उभारले जाणार आहेत. कौपीनेश्वर मंदिर हे ठाणे जिल्ह्यासह राज्यभरातील शिवभक्तांचे श्रद्धास्थान आहे. या ठिकाणी भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात. हे मंदिर ठाण्यातील मुख्य बाजारपेठेत वसलेले आहे. त्याच्या मागील बाजुस मासुंदा तलाव आहे. तर दुसऱ्या बाजुस भाजी मंडई आहे. या ठिकाणी दशक्रिया विधी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक येत असतात. मराठी नव वर्ष स्वागतासाठी या मंदिर समितीकडून स्वागतयात्रेचे आयोजन केले जाते. या मंदिरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक राजकीय मंडळी दर्शनासाठी येत असतात. तसेच महाशिवरात्रीनिमित्त पहाटेपासूनच भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. यंदाच्या महाशिवरात्रीनिमित्त येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये या उद्देशाने कौपीनेश्वर मंदिर समितीने विशेष नियोजन केले आहे.

जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या कौपीनेश्वर मंदिरात नेहमीच भाविकांची गर्दी असते. श्रावण महिन्यातील सोमवार आणि महाशिवरात्रीच्या दिवशी मंदीरात भाविकांची मोठी गर्दी असते. या गर्दीच्या काळात अनुचित प्रकार घडण्याची शक्यता लक्षात घेऊन श्री कौपिनेश्वर मंदिर समितीकडून दरवर्षी विशेष खबरदारी घेतली जाते. यंदाही अशाचप्रकारे गर्दीचे विभाजन करण्यासाठी समितीने नियोजन आखले आहे. ठाण्याची मुख्य बाजारपेठ, भाजी मंडई आणि मासुंदा तलाव अशा चहुबाजुने गर्दीच्या परिसरात वसलेल्या या मंदिरामध्ये महाशिवरात्रीनिमित्त होणाऱ्या गर्दीचे विभाजन केले जाणार आहे. यामध्ये ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला, अपंग, तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी असे चार प्रवेश द्वार तयार करण्यात आलेले असून या मार्गामधून मंदीरात दर्शनासाठी जाण्याचा आणि तेथून बाहेर पडण्याचा मार्ग तयार करण्यात आला आहे.

# कोनगाव पोलीस ठाण्यातील पीएसआयला लाच घेताना अटक


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भिवंडी येथील कोनगाव पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) राजेश डोंगरे (३४) याला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने (एसीबी) १० हजार रुपयांची लाच घेताना ताब्यात घेतले आहे. हत्येच्या प्रयत्न प्रकरणी दाखल गुन्ह्यात आरोपी करू नये यासाठी त्याने तक्रारदाराकडून लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले आहे. राजेश डोंगरे विरोधात कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोनगाव पोलीस ठाण्यात राजेश डोंगरे हे पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत आहेत. कोनगाव पोलीस ठाण्यात हत्येच्या प्रयत्न प्रकरणात एक गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणातील एकाला आरोपी करु नये यासाठी डोंगरे याने त्यांच्याकडून ८० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तडजोडीअंती २५ हजार रुपये देण्याचे ठरले होते. अखेर त्यांनी याप्रकरणी तक्रार देण्यासाठी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. त्यांनी राजेश डोंगरे याच्याविरोधात तक्रार दाखल केली. दरम्यान, शनिवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता, डोंगरे याने १० हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानंतर तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून राजेश डोंगरे याला १० हजार रुपये घेताना ताब्यात घेतले. याप्रकरणाची नोंद कोनगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

ठाणे, कोकण पट्ट्यात मागील वर्षभरात लाचखोरीमध्ये सर्वाधिक कारवाई पोलिसांवर झाली आहे. ठाणे लाचलुपत प्रतिबंधक विभागाने १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत रचलेल्या सापळ्यांमध्ये ठाण्यासह कोकण क्षेत्रातील २१ पोलीस अधिकारी आणि कर्मचारी सापळ्यात अडकले होते. त्यापाठोपाठ महसूल, पालिकेतील कर्मचाऱ्यांचेही लाच घेण्याचे प्रमाण अधिक असल्याचे कारवाईतून स्पष्ट झाले आहे. लाच घेणे आणि देणे दोन्ही गुन्हे असतानाही ठाणे, पालघर आणि तळ कोकणामध्ये लाचेचा विळखा शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये घट्ट पकडला आहे. त्यातही लाच घेण्यामध्ये पोलीस अव्वल ठरल्याचे कारवाईतून आढळून आले आहे. कारवाई टाळण्यासाठी, जामीन मिळवून देणे, अटक करु नये अशा विविध कारणांसाठी पोलिसांनी लाच मागितल्याचे समोर आले आहे. २०२४ मध्ये ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एकूण ६६ सापळे रचले होते. त्यामध्ये ९८ जणांविरोधात गुन्हे दाखल झाले.

या सापळ्यांमध्ये सर्वाधिक कारवाया पोलिसांविरोधात झाल्या आहेत. ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या परिक्षेत्रात ठाणे, नवी मुंबई, पालघर, रायगड-अलिबाग, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हा भाग येतो. या क्षेत्रांत ग्रामीण आणि शहरी पोलीस असा दोन्ही भाग येतो. विभागाच्या कारवाईत एकूण २१ पोलिसांवर लाचखोरीचे गुन्हे दाखल झाले.



## संत गाडगेबाबा
# स्वछतेचे जनक

**१**

माणसातील संत जन्मले
घाणीतून कमळ फुलवले
जनतेस आचरण शिकवले
स्वछतेचे धडे गिरवले.

झाडू घेऊन हाती
गावं स्वच्छ होती
केर कचरा न राहती
निर्मळ मन पाहती.

खाऊनी आपली शिदोरी
घालवली मक्तेदारांची मुजोरी
लावीत सर्व गावांत हजेरी
केली बुवाबाजींवर शिरजोरी.

अंधश्रद्धेस पळताभुई थोडी
लाविली जनतेस गोडी
दुर्गुण बाहेर काढी
दृष्टांचे लक्तरे ओढी.

मायेने समजवी गडी
वणवण करुनि झाडी
असा संत न होई पृथ्वी वरी
शिकवणं घेऊ त्यांची थोडी.

**२**

संत झालेत आधुनिक
केर काढत केरसुणीत
सांगतं ज्ञान वाणीत
प्रबोधन सांगणं अगणित.

सांगितले ज्ञान विकासाचे
धडे दिले स्वछतेचे
कथा कीर्तन करतं
पाश तोडत अंधश्रध्येचे.

नको बुवा बाजी
लावु नका काजी
देव नाही दगडात
सांगतं सारं डेबूजी.


देऊ नका बळी
लावत स्वछतेची गोडी
बुवाबाजांची लक्कर वोढी
माणसं सारी साधीभोळी.

सद्विचार आचार पाळत
शिकवला लोकांना सदाचार
देव शोधला माणसात
दिला सत्य विचार.



**श्री.प्रदीप मनोहर पाटील**
गणपूर, ता. चोपडा जिल्हा. जळगाव.
पिन. 425108 मो. 9922239055

# वाहन पार्किंगसाठी शासकीय पाट्यांचा गैरवापर




**मुरबाड दि.२३ -(प्रतिनिधी )**आपल्या देशामध्ये सरकारने घालून दिलेले किंवा कायद्याने घालून दिलेले नियमांची अंमलबजावणी करण्याची ते धाब्यावर बसवण्याचे प्रकार सर्रासपणे घडत आहेत अशाच प्रकारे स्वतःच्या वैयक्तिक गाडीवर शासनाच्या विविध शाखांचे नाम फलक लावण्याची मोठी स्पर्धा सध्या वाहन चालकांमध्ये लागली आहे यामुळे वाहतूक शाखा व प्रादेशिक परिवहन खाते यांनी घालून दिलेल्या नियमांची पायमळणी होत आहे . अशा वाहन चालकांवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.विशेष बाब म्हणजे मोटार वाहन अधिनियम १९८८ नुसार सरकारी अधिकारी कर्मचारी यांना खाजगी वाहनावर सरकारी नावांच्या पाट्या वापरण्यास सक्त मनाई आहे तरी शहरी व ग्रामीण भागात खाजगी वाहनावर भारत सरकार महाराष्ट्र शासन किंवा इतर सरकारी नावाचा वापर करणे कायद्याने बंदी असतानाही वाहन अधिनियम १९८८ च्या कलम१७७ चे उल्लंघन ठरते असे असतानाही ग्रामीण सह शहरी भागात सर्व नियम धाब्यावर ठेवून अशा प्रकारच्या खाजगी वाहनावर सरकारी पाट्या लावणे कायदेशीर गुन्हा असतानाही अशा पाट्यांचा सध्या झालेला सुळसुळाट झाल्याचे चित्र सर्रासपणे पाहायला मिळत आहे महसूल विभाग महाराष्ट्र शासन महापालिका भारत सरकार व पोलीस अशा नावाच्या पाट्या रस्त्याच्या कडेला उभे केलेले वाहन वाहतूक शाखेने टोचन करू नये व आपण कोणीतरी असल्याचे दाखवण्यासाठी अशा खाजगी गाड्यांवर असे नाम फलक लावण्याची स्पर्धा वाहन चालकांमध्ये लागली आहे . याकडे प्रादेशिक परिवहन अर्थात आरटीओ व वाहतूक शाखा कधी लक्ष देणार अशी मागणी नियमाचे पालन करणाऱ्या वाहन चालक व सुज्ञ नागरिकांकडून केली जात आहे राज्य व केंद्र सरकारच्या अनेक शाखेतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या गाड्यांचा ताफा जाताना त्यांच्या गाड्यांवर संबंधित अधिकारी वर्ग यांच्या वाहनांवर महाराष्ट्र शासन भारत सरकार अशा नावाच्या पाट्या लावलेल्या असतात तसेच मंत्री महोदय यांच्या वाहनावरही नावाच्या पाट्या दिसून येतात परंतु अलीकडच्या काळात संबंधित विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सुद्धा सर्व नियम धाब्यावर बसून आपल्या खाजगी गाडीवर ही आपण या शाखेमध्ये कामाला आहोत असे दाखवून देण्याची व तसे नाम फलक स्टिकर दुचाकी ते चार साठी लावण्याची स्पर्धा लागली आहे वाहतूक शाखा व प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धुळफेक करून सदर गाड्या सर्रासपणे रस्त्याला रस्त्याच्या कडेला उभ्या करून ठेवल्या जातात मात्र अशा परिस्थितीत सर्वसामान्य माणसांच्या वाहनांनी काय करायचं असं सवाल या निमित्ताने पुढे आला आहे काही ठिकाणी तर कुटुंबातील व्यक्ती कामाला असते तर कुटुंबातील व्यक्ती त्या व्यक्तीच्या नावाने गाडीवर स्टिकर लावून बिंदासपणे फिरत असते अशा प्रकारे सध्या सर्वत्र अशा गाड्यांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाला आहे काही दिवसापूर्वी अशा वाहनांवर प्रादेशिक परिवहन खाते व वाहतूक शाखेने कारवाई सुरू केली होती थोडे दिवस वातावरण शांत झाल्यानंतर पुन्हा तशाच प्रकारच्या पाट्या वाहनांवर दिसू लागले आहेत. अशा पाट्या लावणाऱ्या वाहन चालकांवर प्रादेशिक परिवहन खात्याचे अधिकारी काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.**कायदा धाब्यावर बसून आशा पाट्या लावून फिरणाऱ्या वाहनांमध्ये खरंच शासकीय अधिकारी आहेत का? हा एक प्रश्न यक्ष उभा राहिला आहे. गुन्हेगाराकडूनही अशा पाट्यांचा गैरवापर केला जाऊ शकतो एरवी सर्वसामान्यांना या ना त्या कारणारून वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी दंडात्मक कारवाई करणारे शहर/ग्रामीण पोलीस मात्र ही बाब गंभीर असूनही अशा वाहनाविरोधात कठोर कारवाई करत नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जाते*

# नवीन बांधकामांच्या ठिकाणी सीसीटीव्ही बंधनकारक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील पुर्नविकास तसेच नव्या इमारतींच्या बांधकामांच्या ठिकाणी सीसीटीव्ही लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. पालिकेने निश्चित केलेल्या बांधकाम नियमावलींचे काटेकोर पालन होण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी मानक प्रणालीचे पालन न करणाऱ्या ८७ व्यावसायिकांवर पालिकेने कारवाईचा दट्टया लावत सुमारे १.१७ कोटींचा दंड वसुल केला होता. दंड आकारल्यानंतरही बांधकामाच्या ठिकाणी नियमावलींचा भंग होत असल्याने आता सीसीटीव्हींद्वारे नजर ठेवण्यात येणार असून या सीसीटीव्हींची तपासणी पालिकेच्या अधिकाऱ्यांना करता येणार असल्याची माहिती पालिकेच्या नगररचना विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लोकसत्ताला दिली आहे. शहरात सुरू असलेल्या बांधकाम नियमावलीबाबत बांधकाम व्यावसायिकांकडून सातत्याने नियमावलींचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने पालिकेने बांधकाम व्यावसायिकांवर कठोर कारवाई केली आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःहून दाखल करुन घेतलेल्या सुमोटो याचिकेनुसार तसेच ११ डिसेंबर २०२३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, वायु व ध्वनी प्रदूषण कमी करण्याबाबत आदेशित केलेले होते. त्यानुसार तसेच शहरातील ध्वनी, वायू प्रदूषण त्याचप्रमाणे रात्री अपरात्री ब्लास्टींगच्या अनुषंगाने नागरिकांकडून नवी मुंबई महानगरपालिकेकडे सातत्याने तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे अखेर कारवाई सुरू केली आहे.

## Public Notice
### Share transfer

Notice is hereby given to the public that the flat and shares more particularly described in the schedule here under written is being transferred in name of 1) Mrs.Radha Rajgopal kulkarni legal heirs of late Mr.Rajgopal kulkarni All PERSONS having any claim in respect thereof by way of sale, exchange, gift, mortgage, charge, trust, inheritance, possession, lease, lien or otherwise howsoever are requested to inform the same in writing to the undersigned having theirAddress ...E16, Room 2, Kanishka Sankul Society, Dattawadi Road, Next to Union Bank, Chh Shivaji Maharaj Chowk,Badlapur East 421503 ambernath taluka, DIST. Thane. Maharashtra within 14 days from the date here of failing which, the claim or claims if any, of such person or persons will be considered to have been waived and/ or abandoned and the transfer shall be completed.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे ■ सोमवार ■ 24 फेब्रुवारी 2025

jeevandeepvartanews2020@gmail.com



# संत निरंकारी मिशनचे स्वच्छ जल - स्वच्छ मन अभियान !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड.दि.२३ :** संत निरंकारी मिशन द्वारे स्वच्छ जल स्वच्छ मन या अभियाना मार्फत मुरबाड तालुक्यातील सरळगाव येथील संगमेश्वर येथे पाण्यातील स्वच्छता व बाहेरील संपूर्ण परिसराची स्वच्छता सावर्णे ब्रांच युनिट २०८२ यांनी केली ,त्यावेळी ब्रांच मुखी रघुनाथ खाकर ,सेवादल शिक्षक भरत गारे , अरूणा खाकर उपसभापती पंचायत समिती, मुरबाड ,सहाय्य शिक्षिका गुलाब खाकर,मुरबाड,गोड्याचापाडा प्रबंधक बाळू टोहके, सरळगाव प्रबंधक लक्ष्मण रोठे,करवेळा प्रबंधक भरत भावार्थे,रावसाहेब खेडकर , पाटील चंदर भला,सेवादल दिलीप भला ,अनिता भावार्थे,जगन भला,रूपाली कोलेकर, पवित्र आसवले,गणपत कार्बळ अनेक महात्मा उपस्थित होते,



# रस्त्याच्या दुरुस्तीमुळे भिवंडी-ठाणे वाहतूक यंत्रणा विस्कळीत

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**झिडके-अंबाडी :** भिवंडी-ठाणे या महामार्गावर रस्त्याच्या कामकाजाच्या नावाखाली गेल्या दोन ते तीन वर्षांपासून व सद्यस्थितीत भिवंडी बायपास ते ठाणे हा प्रवास करताना अनेक तासांचा कालावधी लागत आहे, या नियमीतच्या प्रवाशांच्या छळाला सर्वस्वी जबाबदार या विभागाची वाहतूक पोलीस यंत्रणा असल्यामुळेच दररोजचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जीवाशी खेळ खेळतात वाहतूक पोलीस. याबाबत संबंधित वाहतूक पोलीस विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई होण्यासाठी राज्याचे गृहखाते पुढाकार कधी घेणार? अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांची आहे.

प्रत्यक्षात भिवंडी बायपास ते ठाणे हा प्रवास जास्तीत-जास्त अर्धा तासाभराचा आहे,परंतु या प्रवासाकडे वाहतूक पोलीस यंत्रणेचे पूर्णतः दुर्लक्ष असल्यामुळे भिवंडी बायपास ते ठाणे हे अंतर पार करण्यासाठी किती वेळ लागेल याची शाश्वती नाही.हा रस्ता प्रचंड वाहतुकीचा आहे.या रस्त्यावर अनेक प्रकारची वाहने चालतात,मुंबई, पुणे या महत्वाच्या शहरांकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या असंख्य आहे,परंतु वाहतूक पोलीस यंत्रणा या ठिकाणी कुचकामी ठरत आहे,याचा दुष्परिणाम प्रवाशांना सहन करावा लागत आहे,याबाबत राज्याच्या गृह खात्याने कडक कारवाई करून,प्रवाशांच्या जिवीताची काळजी घ्यावी,अशी कळकळीची विनंती वजा ताकीद देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत उन्हाळा ऋतू सुरू झालेला आहे,अशा वेळेस भिवंडी बायपास ते ठाणे या अंतरावरून प्रवास करताना,शारीरिक आजारपण असणाऱ्या प्रवाशांच्या बाबतीत काहीही दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाहीत.तरी या रस्त्यावरील वाहतूक पोलीस यंत्रणेने दुर्लक्ष न करता येथील वाहतुकीबाबत गांभीर्यपूर्वक दखल घेऊन, प्रवाशांच्या जिवीताशी न खेळता काळजी घ्यावी अशी तमाम प्रवाशांची कळकळीची विनंती आहे.

# मुंबई-नाशिक महामार्गावरील 'जुना कसारा घाट' सहा दिवस बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मुंबई-नाशिक महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी आहे. येत्या सहा दिवसात या मार्गानं प्रवास करणार असाल तर तुम्हाला त्रासाला सामोरं जावं लागणार आहे. पुढील सहा दिवस सकाळी 8 ते संध्याकाळी 6 पर्यंतच्या कालावधीत महामार्गावरील जुना कसारा घाट वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. विशेष म्हणजे जुन्या कसारा घाटातील डोकावणाऱ्या दरडी, जुनी महाकाय वृक्ष देखील या कालावधीत काढली जाणार आहेत. त्यामुळं पावसाळ्यात त्रास होणार नाही, अशी मागणी आपत्ती व्यवस्थापन सदस्यांकडून करण्यात येत आहे.



'या' दिवशी जुन्या कसारा घाटात रस्ता दुरुस्ती : मुंबई-नाशिक महामार्गावरील जुन्या कसारा घाटात रस्ता दुरुस्तीच्या कामासाठी दोन टप्प्यात पुढील 6 दिवस ट्रॅफिक ब्लॉक घोषित करण्यात आलं आहे. सकाळी 8 ते संध्याकाळी 6 पर्यंत या वेळेत हा ट्रॅफिक ब्लॉक घेतला जाणार आहे. सोमवार, (24 फेब्रुवारी) ते गुरुवार (27 फेब्रुवारी) या कालावधीत तसंच 3 मार्च ते 6 मार्च या दरम्यान जुन्या कसारा घाटात रस्ता दुरुस्ती आणि पावसाळ्याच्या पूर्वतयारीसाठी कसारा घाटातून नाशिककडं जाणारी वाहतूक दिवसभरासाठी बंद करण्यात येणार आहे. या दरम्यान नाशिक दिशेकडं जाणारी वाहतूक नाशिक मुंबई लेनवरील नवीन कसारा घाटातून वळवण्यात येणार आहे. त्यामुळं प्रवाशांना काही दिवस त्रासाला समोरं जावं लागेल.

नवीन कसारा घाटातून होणार वाहतूक : जुना कसारा घाट दुरुस्तीसाठी बंद असणार असल्यानं लहान वाहनाची वाहतूक नवीन कसारा घाटातून वळवण्यात येणार आहे. परंतु, या दरम्यान या मार्गावरून अवजड वाहनांना पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. तर अवजड वाहने मुंबई पुणे एक्सप्रेसवेच्या मार्गे वळविण्यात येणार आहेत. दरम्यान कसारा घाटातील रस्ते दुरुस्ती आणि त्यामुळं वळवण्यात येणारा मार्ग लक्षात घेता, मुंबई-नाशिक-शिर्डी दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना काही अडचण असल्यास मदतीसाठी कसारा पोलीस, महामार्ग पोलीस घोटी केंद्र, महामार्ग पोलीस शहापूर केंद्र, आपत्ती व्यवस्थापन टीम ही नवीन कसारा घाटात कार्यरत राहणार आहे. तसंच नवीन कसारा घाटात ठिकठिकाणी पोलीस कर्मचारी आणि मदत केंद्र उभारली जाणार असल्याची माहिती, महामार्ग वाहतूक विभागाचे अधिकारी गडकरी यांनी दिली.

# योगी धाम परिसरात पोलीस चौकीचे लोकार्पण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील योगी धाम परिसरात मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती वाढली असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी माय मराठी प्रतिष्ठानच्या वतीने योगी धाम चौकात पोलीस चौकी उभारण्यात आली असून या पोलीस चौकीचे लोकार्पण परिमंडळ 3 चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, खडकपाडा पोलीस स्टेशनचे व.पो.नि डॉ अमरनाथ वाघमोडे, माय मराठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन जाधव, सचिव अतुल सरगर आदी मान्यवर उपस्थित होते.

शनिवारी सायंकाळी योगी धाम कल्याण पश्चिम येथे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या सुचने प्रमाणे व पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली माय मराठी प्रतिष्ठान यांच्या सौजन्याने खडकपाडा पोलीस स्टेशन अंतर्गत साई मंदिर चौक योगिधाम कल्याण पश्चिम येथे पोलीस चौकीचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी उद्घाटनपर भाषणात पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी उपस्थित नागरिकांना सायबर जागृती बाबत घ्यायची खबरदारी तसेच ज्येष्ठ नागरिक सुरक्षा बाबत मार्गदर्शन केले आणि तात्काळ मदती करता डायल 112 क्रमांकाबद्दल माहिती दिली. तसेच नवीन तीन कायदेविषयक माहिती देऊन जनजागृती केली. वाढत्या नागरिकरणामुळे योगी धाम परिसरात पोलीस चौकीची आवश्यकता होती, त्यानुसार याठिकाणी पोलीस चौकी सुरू करण्यात आली आहे. 24 तास पोलीस कर्मचारी याठिकाणी उपलब्ध राहतील. पोलीस आणि नागरिक यांच्यातील दरी कमी होणे आवश्यक आहे. नागरिकांकडे जी काही माहिती असेल ती नागरिकांनी द्यावी त्यानुसार पोलिसांना कारवाई करणे सोपे जाईल असे आवाहन पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी यावेळी केले.

# राज्य स्तरीयस्पर्धेत सिंघानिया शाळेचे बालनाट्य प्रथम

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित २१ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा २०२४-२५ ची अंतिम फेरी यंदा रत्नागिरी येथे स्वातंत्रवीर सावरकर नाट्यगृहात पार पडली.

अंतिम फेरीत महाराष्ट्रातल्या विविध केंद्रातून एकूण ३२ बालनाट्य दिनांक १२ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी दरम्यान सादर करण्यात आली. सदरच्या स्पर्धेत श्रीमती सुलोचना देवी सिंघानिया स्कूल, ठाणे या संस्थेच्या संदीप प्रभू गचांडे लिखित व वैभव शीतल सुरेश उबाळे दिग्दर्शित 'लहान मुलांची बाप गोष्ट!' या बालनाट्याला सर्वोत्कृष्ट बालनाट्य प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

तसेच प्रथम बालनाट्य या परितोषिकासोबत 'लहान मुलांची बाप गोष्ट!' या बालनाट्याला एकूण चार महत्वपूर्ण पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत! सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन-वैभव सुरेश उबाळे ( प्रथम पारितोषिक ) सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना- साईप्रसाद शिर्सेकर ( द्वितीय पारितोषिक ) सर्वोत्कृष्ट नेपथ्य-केतन दुदवडकर( द्वितीय पारितोषिक ) सर्वोत्कृष्ट अभिनय-मनस्वी केसरकर ( स्त्री विभाग - रौप्यपदक )या नाटकात साहिल गायधनी, ओवी महाजन, म्रिदिनी भोईर, नव्या काळे, काव्या जोशी, गंधार मुळे, हर्षिका केळकर, नुपूर बवरे, रिया ठाकूर, मनस्वी केसरकर, अनुरा सोनजे, अनय थत्ते, अनायका प्रधान, आशी प्रधान, अर्शिया प्रधान, सनिष कोल्हे, सिद्धीक्षा जाधव, आनंदी लेले या बालकलाकारांनी आपली कला सादर केली. या नाटकाचे संगीत प्रणव चांदोरकर, संगीत संयोजन निमिष घायतडके व रसिक वाघमारे, रंगभूषा व वेशभूषा पूजा वंदना संजय शिंदे यांनी अतिशय उत्कृष्टरित्या सांभाळले.

त्यासोबतच रंगमंच व्यवस्था साक्षी रायकर, निखिल बाविस्कर, समृद्धी सुतार, मैथिली मोंडे, साक्षी सूर्यवंशी, गितेश राणे, संस्कृती पवार, सुमित यादव, हेमंत कांबळे, ओमकार सोंडकर, सिद्धार्थ गांगुर्डे, प्रतीक घाडगे या सर्वांनी अत्यंत चपळाईने सांभाळली. या संपूर्ण नाटकाचे धनुष्यबाण पेलणारे मुख्य आधारस्तंभ म्हणजे श्रीमती सुलोचना देवी सिंघानिया शाळेच्या प्राथमिक विभाग प्रमुख डॉ. दीप्ती जोशी व सौ श्रेया क्षीरसागर आणि वेशभूषाकार पूजा संजय शिंदे, असे दिग्दर्शक वैभव उबाळे यांनी सांगितले.

लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच आपली कला उचित व्यासपीठावरून लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालय जी राज्य बालनाट्य स्पर्धा दरवर्षी आयोजित करत आहे त्याबद्दल संपूर्ण लहान मुलांची बाप गोष्ट या बालनाट्याच्या टीम कडून आभार व्यक्त करण्यात आले. रत्नागिरी मध्ये अंतिम फेरीचे उत्तम आयोजन आणि नियोजन केल्याबद्दल रत्नागिरी आयोजन समितीचे देखील शाळेतर्फे आभार व्यक्त करण्यात आले.

# कांबा येथील चैतन्य ई टेक्नो स्कूलमध्ये शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा पूर्ण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या अंमलबजावणीची सुरूवात झाली असूनत्याचाच एक भाग म्हणून कल्याण तालुक्यातील इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या सर्व शासकीय व अनुदानित शाळांतील शिक्षक आणि पर्यवेक्षकीय यंत्रणेच्या 'शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.०' या प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा श्री चैतन्य ई टेक्नो स्कूल कांबा येथे पार पडला. शिक्षकांचे हे सेवांतर्गत प्रशिक्षण एकूण पाच दिवसांचे असून त्याचा पहिला टप्पा १० ते १५ फेब्रुवारी दरम्यान नारायणा ई टेक्नो स्कूल, वरप येथे तर दुसरा टप्पा १७ ते २२फेब्रुवारी दरम्यान नुकताच पूर्ण झाला. या प्रशिक्षणामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा-पायाभूत स्तर आणि शालेय शिक्षण, क्षमता आधारित अध्ययन-अध्यापन प्रक्रिया व मूल्यांकन, विद्यार्थी समग्र प्रगती पत्रक, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा या विषयांवर प्रशिक्षकांकडून प्रशिक्षणार्थी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले.






महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण परिषद पुणे यांच्याकडून राज्य, जिल्हा आणि तालुकास्तरावर हे प्रशिक्षण संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षक व पर्यवेक्षकीय यंत्रणेसाठी दिले जात आहे. कल्याण तालुकास्तरावरील हे प्रशिक्षण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. संजय वाघ आणि पंचायत समिती कल्याण येथील गटशिक्षणाधिकारी डॉ. रुपाली खोमणे, विस्तार अधिकारी श्रीम.विद्या नाईकवाडी यांच्या सनियंत्रणाखाली आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणादरम्यान विषय तज्ज्ञ श्री. जनार्दन कोर, श्री.विठ्ठल भोईर, श्री. रविंद्र गायकवाड यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली.

"नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण क्षेत्रात झालेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवरील हे प्रशिक्षण शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास आणि शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत होण्यासाठी निश्चितच महत्वाचे ठरेल, असा विश्वास वाटतो" असे मत गटशिक्षणाधिकारी डॉ. रुपाली खोमणे यांनी व्यक्त केले. कल्याण तालुक्यातील ६०टक्के शिक्षकांचे प्रशिक्षण या दोन टप्प्यात पूर्ण झाले असून उर्वरित शिक्षकांचे प्रशिक्षण पुढील टप्प्यात पूर्ण केले जाणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदी ५.१५ व ५.१६ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक शिक्षकाचे एका शैक्षणिक वर्षामध्ये किमान ५० तासांचे प्रशिक्षण होणे अपेक्षित आहे. तसेच शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत बदलाच्या केंद्रस्थानी असल्याने प्राथमिक स्तरापासून उच्च माध्यमिक स्तरापर्यंतच्या प्रत्येक शिक्षकाची क्षमता बांधणी, शिक्षक सक्षमीकरण व सबलीकरण यादृष्टीने हे प्रशिक्षण महत्वाचे मानले जात आहे.

# रायते- पिंपळोलीत प्रधानमंत्री आवास योजना प्रमाणपत्राचे वाटप!

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●




**रायते :** दि.२३- प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत महाराष्ट्रातील २० लाख लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी पत्र आणि १० लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे.गृप.ग्रामपंचायत रायते-पिंपळोली गावातील ग्रामस्थांना लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण योजने संदर्भात माहिती व लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे देखील वाटप अंगणवाडी केंद्र, रायते येथे आदर्श सरपंच पुरस्कार प्राप्त सरपंच .समिता संतोष सुरोशी यांच्या हस्ते करण्यात आले.समवेत उपसरपंच .मयुर सुरोशी, सदस्य हरेश पवार, सदस्य यतिन बुटेरे, लिपिक मानसी देसले, जि.प. शाळेच्या मुख्याध्यापिका चित्रा बोंडे अंगणवाडी सेविका सुनंदा पवार यांचेसह अन्य शासकीय पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. गरीब आणि गरजू कुटुंबांचे हक्काचे घर असावे या उद्देशाने केंद्र सरकार राबवित असलेली ही योजना महत्त्वपूर्ण आहे. या योजनेमुळे अनेक कुटुंबांना सुरक्षित आणि सन्मानाने जगता येईल, तसेच त्यांची सामाजिक आणि आर्थिक उन्नती होण्यास मदत होईल असे गृप.ग्रामपंचायत रायते-पिंपळोलीच्या सरपंच .समिता संतोष सुरोशी यांनी आपल्या मनोगतात भावना व्यक्त केल्या.

# केडीएमसीकडून गटारांना लोखंडी झाकणे बसविण्यास सुरुवात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण शहरात अखेर ड्रेनेजला लोखंडी झाकणे बसविण्याच्या कामाला सुरवात झाली असून शिवसेना उपशहर प्रमुख, माजी नगरेसवक मोहन उगले यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सिमेंट कॉंक्रिट रस्त्यात असणाऱ्या चेंबरची झाकणे हि प्लास्टीकची असल्या कारणाने गाड्यांच्या वजनाने सारखी तुटत असत. तुटलेल्या या चेंबरच्या झाकणांमुळे काही ठिकाणी अपघात देखील झाले होते. तसेच एखादा भीषण अपघात होऊन जीवितहानीची देखील शक्यता होती. याबाबत शिवसेना उपशहर प्रमुख तथा माजी नगरसेवक मोहन उगले यांनी कार्यकारी अभियंता घनशाम नवांगूळ आणि केडीएमसी अधिकारी योगेश गोटेकर यांच्याशी चर्चा करत या जाड प्लास्टीक झाकणांऐवजी लोखंडी झाकणे चेंबरवर बसविण्याची मागणी उगले यांनी केली होती.

तुटणाऱ्या या झाकणांमुळे वारंवार हि झाकणे बदली करावी लागत होती. यामुळे जनतेच्या कररूपी पैशांचा अपव्यय होत होता. नागरिकांच्या पैशांचा हा अपव्यय टाळण्यासाठी मोहन उगले यांच्या विनंतीनुसार चेंबरवर लोखंडी झाकणे बसविण्याच्या कामाला मंजूरी देण्यात आली असून सुमारे एक कोटी रुपये खर्च करून कल्याण शहरातील चेंबरवर हि लोखंडी झाकणे लावली जाणार आहेत. या झाकणाचे वजन 55 किलो असून यामुळे हि झाकणे न तुटता दीर्घकाळ टिकणार आहेत. यामुळे नागरिकांच्या पैशाच्या बचती सोबतच आपघातांपासून नागरिकांची मुक्तता होणार असल्याचे मोहन उगले यांनी सांगितले.

# होपमिरर फाउंडेशनच्या वतीने आरोग्य शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त होपमिरर फाउंडेशनने बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेज आणि अपोलो हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन नुकतेच केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन बाळासाहेब ठाकरे विधी महाविद्यालयाचे अध्यक्ष बबन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. ज्याचा उद्देश आरोग्य विषयक जागरूकता वाढवणे आणि समाजाला मोफत वैद्यकीय सल्ला देणे हा आहे. या शिबिरात आरोग्याच्या विविध बाबींचा समावेश करण्यात आला. होपमिरर फाऊंडेशनचे संस्थापक रमझान शेख यांनी संस्थेच्या आणि आरोग्य शिबिराच्या अंमलबजावणीबद्दल प्रचंड समाधान व्यक्त केले. त्यांनी विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उच्च उपस्थिती आणि संस्थेच्या बाहेरील अभ्यागतांची लक्षणीय उपस्थिती बद्दल आभार मानले ज्यांनी विनामूल्य तपासणीचा लाभ घेतला. रमझान शेख यांनी सर्व स्वयंसेवकांचे आणि अपोलो हॉस्पिटलच्या टीमचे त्यांच्या पाठिंब्याबद्दल मनापासून आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. विधी महाविद्यालयाच्या प्रिन्सिपल वैशाली बोराडे, राहुल कांबळे, हमीदा अन्सारी, रश्मु नायर, अमजद शेख यांचे आभार मनाले.

# जीबीएसचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी नियमांचे पालन करा

## मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ.भरत बास्टेवाड यांचे निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** राज्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोम (जी.बी.एस) विषाणूंचा तसेच अन्य साथीच्या रोगांचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरिता ग्रामपंचायत स्तरावर पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण करणे, पिण्याच्या पाण्याचा स्त्रोतांची,वितरण बिंदूच्या (शाळा ,अंगणवाडी, घरे इत्यादी) पाणी नमुन्यांची गावातील प्रशिक्षित महिला, स्वयंसेवकामार्फत प्रत्येक महिन्यातून एकदा जैविक क्षेत्रीय तपासणी संचाद्वारे (FTK-H2S vials) तपासणी करण्याचे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड यांनी केले.




जीबीएस विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शुद्ध पाणीपुरवठा होण्याच्या अनुषंगाने गाव पातळीवर नळ पाणीपुरवठा योजनांचे स्रोत शाळा, अंगणवाडी व नळाद्वारे घरामध्ये उपलब्ध होणारे पाणी यांच्या जैविक तपासणीसाठी आवश्यक पाणी नमुने अभियान स्वरूपामध्ये गोळा करून नजीकच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या प्रयोगशाळेमध्ये जमा करावे. जीबीएसचा व अन्य साथरोगचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रयोगशाळेत जैविक तपासणी करण्यास प्राधान्य देण्यात यावे. ग्रामीण कुटुंबाला कार्यात्मक घरगुती नळ जोडणीद्वारे पुरेशा प्रमाणात किमान 55 लिटर प्रतिदिन प्रतिव्यक्ती विहित गुणवत्तेचे पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील जनतेला घरगुती व सार्वजनिक स्रोत, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी केंद्र, आरोग्य केंद्र ,उपकेंद्र इत्यादी सातत्यपूर्वक गुणवत्तापूर्वक शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट निश्चित करावे. ग्रामीण जनतेला गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम ग्रामीण भागात गावागावात राबविण्यात यावे. याद्वारे गावातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची व घरगुती नळ कनेक्शन द्वारे पुरवठा करण्यात येणाऱ्या(FHTC) पाण्याची (किमान दोन नमुने) रासायनिक तपासणी वर्षातून एकदा व जैविक तपासणी वर्षातून दोनदा प्रयोगशाळेत जमा करण्यात यावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड यांनी केले आहे.

तसेच जीबीएस व अन्य साथ रोगाचा प्रादुर्भाव टाळाण्यासाठी पाणी व स्वच्छता विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, ग्रामपंचायत विभाग यांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत. याबाबत पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांनी याबाबत योग्य ती कारवाई करण्याबाबत प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता शुभांगी नाखले यांनी पत्राद्वारे निर्देश दिले आहेत.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com